विदर्भ, मराठवाडा, मुंबई, कोकण, गोवा, अमरावती, उर्वरित संपूर्ण
महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातून वितरीत होणारे एकमेव दैनिक

लोकमान्य सांजवार्ता

R.N.I.NO. 70111/99 PCW/009/2018-2020

# सिटी इंटरनॅशनलग्रुप ऑफ स्कूलची पूरग्रस्तांना मदत




पुणे (प्रतिनिधी) : सिटी इंटरनॅशनलग्रुप ऑफ स्कूलच्या सातारा, वानवडी, औंध या ठिकाणी शाखा आहेत. या सर्व शाखांनी कोल्हापूर, सांगली येथीलपूरग्रस्तांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, कपडे आणि अन्य जीवनावश्यक वस्तूपूरग्रस्त भागातील नार्गरिकांसाठी पाठविल्या. मागील दोन आठवड्यात विद्यार्थ्यांनी शाळांमध्ये या वस्तू जमा केल्या. या मोहिमेमध्ये मोठ्य संख्येन मुले सहभागी झाली होती. त्यांनी जीवनावश्यक औषधे, प्रथमोपचार साहित्य, कपडे, ब्लँकेट्स आणि बेडशिट्स, कँडल्स, टॉर्च, तांदूळ, दाळ, कडधान्य इत्यादी साहित्य गोळा केले. प्रत्येक शाळेतून ६० हून अधिक पेट्या पूरग्रस्त मदत केंद्रांनापाठविण्यातआल्या.

तिन्ही शाळांच्या प्राचार्यांनी विद्यार्थी, शिक्षकांना मार्गदर्शनकेले. सिटी इंटरनॅशनलग्रुप ऑफ स्कूलचे विश्वस्त व संचालक मौलिक शाह म्हणाले, पूरग्रस्तांनाकरण्यातआलेल्या या छोट्या मदतीतून मुलांमध्येसामाजिक बांधिलकीचीजाणीव निर्माणहोईल. तसेचकोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील नागरिकांना आवश्यक ती मदत मिळू शकणारआहे. विद्यार्थी, शिक्षक आणि अन्य सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मनापासूनकेलेली ही मदत निश्चितचआमच्यासाठी कौतकास्पदआहे.